जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०४.०६.२०२५**

पॉन्झी स्किममध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसवणुक करणारा पराग शहा अखेर पोलीसांच्या ताब्यात

वर्तकनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर गुन्हा रजि नं. १२३२/२०२४ भादंवि कलम :- ४०६, ४०९, ४२०, ३४ सह MPID कायदा कलम -३ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील आरोपी १. जयसुख हरीभाई साखरिया उर्फ पटेल, २. सुधिरभाई दलसुखभाई कोटाडिया, ३. अवनितराय बाबुभाई बरवालिया उर्फ पटेल, ४. उमंग संतिभाई कोटाडीया, ५. श्रीमती रंजन सुधिरभाई कोटाडीया, ६. श्रीमती निरू जयसुख साखरीया, ७. राजेश खोडाभाई पांभर उर्फ राजूभाई, ८. प्रविणकुमार मनसुखभाई वोरा, सर्व रा. गुजरात, ९. पराग अशोककुमार शहा, रा. नारायणगाव, पुणे व इतर यांनी माहे मे २०२० ते जानेवारी २०२४ दरम्यान ते क्यु फोन ॲप कंपनीद्वारे Google साठी अनेक Apps बनवितात व त्यावरील जाहिरातींमुळे Google त्यांना प्रचंड प्रमाणात डॉलर्स मध्ये परतावा देते अशी पॉन्झी स्किम राबवून त्यांच्या या Digital Investment च्या पॉन्झी स्किममध्ये अद्यापपर्यंत १२४ गुंतवणूकदारांची रु. ९१,६३,७१,०४७/- ची फसवणूक केल्याबाबतचा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे तपासाधीन आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान फिर्यादी पराग अशोककुमार शहा याचा सदर गुन्ह्यातील सक्रीय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास आरोपी करण्यात आले होते.

नमुद गुन्ह्यातील सदर आरोपीचे ठावठिकाण्याचा कौशल्याने तपास करुन आरोपी पराग अशोककुमार शहा यास दिनांक ०४/०६/२०२५ रोजी नारायणगाव, पुणे येथून ताब्यात घेवून नमुद गुन्ह्यात अटक केली असून त्यास मा.न्यायालयाने दिनांक ११/०६/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजूर केला आहे.

नमुद गुन्ह्यात शेकडो गुंतवणुकदारांनी गुंतवणुक केली असल्याचे तपासात आढळुन येत आहे. त्यामुळे गुंतवणुकदारांच्या संख्येत व फसवणुक झालेल्या रकमेत खुप मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे.

श्री.पराग मणेरे, पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी गुंतवणुकदारांना त्यांच्या झालेल्या या फसव्या योजनेतील गुंतवणुकी बाबत आर्थिक गुन्हे शाखेत माहिती देणे बाबत तसेच सर्वसामान्य जनतेस कोणत्याही प्रकारच्या फसव्या, अवाजवी परताव्याच्या योजनांना बळी न पडण्याबाबत आवाहन केले आहे

सदरची कामगिरी श्री.पराग मणेरे, पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, श्री.दत्तात्रय पाबळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, आगुशा यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र मंडलिक, पोनि/अतुल केदार, पोउनि/रोहन शेलार व सपोउपनि/कलगुटकर, पोहवा/ओवळेकर, पिंपळे, राणीम, मपोशि/कवडे, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी .

.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.